# अमरावती शहर  दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक  ०५/०७/२०२४

दुखापत :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | राजापेठ अप क्र ३९२/२०२४ कलम ११७(२), ३५२, ३५१(२) बी.एन.एस. | अमरावती | घ.ता .वेळ दि. ०१/०७/२४ चे १०-००वा. चे दरम्यान<br>दा.ता.वेळ. दि.०४/०७/२४ चे १७-३३ वा. | एक महिला | १)दिलीप विठ्ठलराव घोडेश्वार वय ४५ वर्ष , २) एक महिला रा. अमरावती | थोडक्यात हकीकत अशा प्रकारे आहे की , नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादी व आरोपी हे एकमेकांचे नातेवाईक असुन फिर्यादी यांनी त्यांची आजी हिला बहिणीला का शिवीगाळ करता याबाबत विचारणा केली असता फिर्यादीची आजी हि फिर्यादीचे बहिणीच्या अंगावर गेली होती. फिर्यादी हि भांडण सोडविण्यासाठी त्यादोघी मध्ये गेली व त्यांनी आजीला बाजुला केले असता फिर्यादीची आजी बाजुला पडली व तिच्या चेह-याला लागले. यावरून फिर्यादीचे काका आरोपी क्र. १ याने फिर्यादीस हातबुक्कीने व पाईपने उजव्या हातावर मारून जखमी केले. त्यामुळे फिर्यादीचा उजवा हात फॅक्चर झाला व त्यास प्लॅस्टर लागले. तसेच आरोपी क्र. २ यांनी फिर्यादीस शिवीगाळ करून मारहान करण्याची धमकी दिली. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट व मेडीकल सर्टी. वरून सदरचा गुन्हा दाखल |

➢ विश्वासघात / फसवणुक :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पोस्टे. नांदगाव पेठ अप.न. २२३/२४ कलम ४०६ भादवी | श्री.चक्रधर ऑटोमोटिव्ह शोरुम. बोरगाव धर्माळे | दि. २५/०५/२०२४ चे १९.०० वा. दरम्याण दि. ०४/०७/२०२४ चे २२.४२ वा. | प्रविण रमेश हिरुळकर वय ४८ वर्ष रा. नरहरी नगर,राजापेठ, अमरावती | सम्यक सुरेंद्र उगले वय २४ वर्ष रा. सिध्दार्थ नगर वलगाव ,अमरावती | हकीकत अशाप्रकारे आहे की यातील फिर्यादी हे श्री.चक्रधर ऑटोमोटिव्ह शोरुम.बोरगाव धर्माळे हे वर्कशॉप मॅनेजर म्हणुन नोकरीला आहे. नमुद घ. ता. वेळी व ठिकाणी यातील आरोपी हा श्री. शिरसाठ यांचे सोबत शोरुम ला येवुन सेल मॅनेजर ज्योती देशमुख यांचे सोबत स्वराज ट्रॅक्टर मॉडेल टारगेट ६३० हा ट्रॅक्टर चा ५,६१०००/ रु. मध्ये व्यवहार झाला. आरोपीचे सीबील व कागदपत्रे चेक केले असता त्यामध्ये गॅरटरचे कागदपत्रे कमी होते. आरोपीने फायनंस सर ला विश्वासात घेऊन दोन तिन दिवसात कागदपत्रे आणुन देतो वरुन ८१,०००/ रु भरुन वरील ट्रॅक्टरची डिलेव्हरी दिली. डिलेव्हरी नंतर दि. ३०/०६/२४ पर्यत आरोपीने गंरटरचे कागदपत्र आणुन दिले नाही. तसेच ट्रॅक्टर बाबत चौकशी केली असता तो दुस-या व्यक्तीला विकला असे समजले. सदर आरोपीने फिर्यादी यांचा विश्वासघात करुन फसवणुक केली. अशा फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ अपघात :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | झोन क्र. | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ<br>माहिती ता.वेळ<br>गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पोस्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर अप क्र ५९९/२०२४ कलम १२५(अ)(ब),२८१ बी.एा.एस सहकलम १८४ मो.वा.का. | ०१ | जे.जे.एम. पानसेंटर समोर कुंभारवाडा अमरावती | घटना ता वेळ ०४/०७/२०२४ चे १९.३० वा .<br><br>दाखल ता वेळ ०४/०७/२०२४ चे २३.३७ वा. | अबरार नवाब रायलीवाले वय२९ रा.गवलीपुरा फ्रेजरपुरा मज्जित जवळ अमरावती | सत्यशिल रमेश मोहाडे वय२८ वर्ष रा.अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी नमुद घटना ता.वेळी व ठीकाणी नमुद घटनास्थळी भाजीपाला घेत होते फिर्यादीचे मोठे वडील हे रस्ता ओलांडत असताना सरदारचौक से यशोदा नगर कडे जाणारी गाडी क्र.एम एच२७एक्स६९७३चा चालक नामे सत्यशिल रमेश मोहाडे वय२८ वर्ष याने त्याचे ताब्यातील गाडी ही भरधाव वेगाने व निष्काळजिपणाने चालवुन फिर्यादीचे मोठ वडीलास धडक मारली त्यामुळे फिर्यादीचे मोठे वडील हे खाली पडले व त्यांचे डोक्याला मार लागला.फिर्यादी यांनी त्यांचे मिंत्राचे मदतीने आटोमध्ये बसुन इर्वीन दवाखाना येथे घेवुन गेले उपचार सुरु आहे. नमुद आरोपी याने त्याच्या ताब्यातील वाहण भरधाव वेगाो व निष्काळजीपणाने चालवुन फिर्यादीच्या मोठे वडीलास जख्मी केले. फिर्यादीच्या अशा जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| ०२ | पो.स्टे. बडनेरा अप.क्र. ४२५/२०२४ कलम २७९, ३३८ भादवि | ०१ | बडनेरा ते यवतमाळ रोड, गुप्ता धाब्या समोर, गोविंदनगरी, ग्राम दाभा, बडनेरा. | घटना ता. वेळ दि. २३.०६.२०२४ चे ११.००वा.<br><br>माहीती वेळ - दि. ०४.०७.२४ चे १८.३० वा.<br>दाखल ता. वेळ - दि. ०४.०७.२४ चे १९.१४ वा. | एक महिला | ऑटो क्र. MH- २७-BW- ८४७६ चा चालक रामचरण महादेव मकेकर, वय ३८ वर्षे, रा. परिवारपरा, वडाळी, अमरावती. | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादी हे त्यांचे पती व इतरांसह ऑटो क्र. MH- २७-BW- ८४७६ मध्ये बसुन कामानिमित्त धानोरा येथे जात असतांना सदर ऑटोचालक आरोपीने त्याच्या ताब्यातील ऑटो हा भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन समोरील मोटर सायकलला धडक दिल्याने ऑटो पलटी झाला. त्यामुळे फिर्यादीचे पती जखमी झाले व इतर प्रवाशांना किरकोळ मार लागला. ऑटोचालकाने इलाजाचा खर्च देतो, असे म्हटले परंतु अद्याप पावेतो कुठलाही खर्च दिला नाही. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |

➤ इतर :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पो.स्टे. फ्रेजरपुरा अमरावती शहर अप क्र. ५९८/२०२४ कलम २९६, ३५१(२) (३). भा. न्या. सहींता. | शिबुपरी वाले यांचे घराजवळ फ्रेजरपुरा अमरावती | घटना.ता.वेळ ०४/०७/२०२४ चे१५.०० वा. दाखल.ता. वेळ ०४/०७/२०२४ चे१७.२६ वा. | यश राजकुमार बियानी वय२३वर्ष रा.फ्रेजरपुरा अमरावती | कुणाल इंदोले रा.शाम नगर अमरावती | हकीकत अशाप्रकारे आहे की यातील नमुद घटना ता वेळी व ठीकाणी यातील फिर्यादी हे फोनवर बोलत असताना नमुद आरोपी हा मोटर सायकलने आला फिर्यादीस तेरे को गिराता असे बोलला फिर्यादीने आरोपीस शिवीगाळ का करतो असे म्हटले असता आरोपीने अप शब्द बोलुन तेथुन निघुन गेला नमुद आरोपी याने फिर्यादीस जुन्या वादाच्या कारणावरुन अश्लिल भाषेत शिवीगाळ करुन मारण्याच्या धमक्या दिल्या.फिर्यादीच्या अशा जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| ०२ | बडनेरा अप.नं. ४२४/२०२४ कलम १४२ महा. पो. का. | बडनेरा बस डेपो समोर. कौशल्य मोबाईल रिपेरींग जवळ, बडनेरा. | दि. ०४.०७.२०२४ चे १५.०० वा. माहीती वेळ - दि. ०४.०७.२०२४ चे १५.०० वा. दाखल वेळ - दि. दि. ०४.०७.२०२४ चे १६.१६ वा. | सरतर्फे सहा.पो.उपनि. प्रमोद गुडधे, ब.न. २७७, पो. स्टे. बडनेरा, अम. शहर. | संकेत अरविंद गजभिये, वय २३ वर्षे, रा. मिलचाळ, नवी वस्ती, बडनेरा. | हकिकत अशा प्रकारे आहे की नमुद घटना ता.वेळी व ठिकाणी यातील नमुद आरोपी हा मा.पो.उप.आ..सा. परि.१ अमरावती शहर यांचे आदेश क्र.पोउपआ/परि.-१/तडीपार/४५७/२०२४/दि.०३.०४.२०२४ नुसार ८ महीन्याकरिता अमरावती शहर व जिल्ह्यामधुन तडीपार असतांना नमुद तडीपार इसम याने अमरावती शहरात कोणताही परवानगी आदेश न घेता मा.पो.उपआयुक्त सा. यांचे आदेशाचे आदेशांचे उल्लंघन करुन घटनास्थळावर फिरतांना मिळुन आला. वरुन सदर आरोपीचे कृत्य कलम १४२, म.पो.का प्रमाणे होत असल्याने सदरचा गुन्हा दाखल |